## भाग-अ

<table>
<tr><td rowspan="5">MHAH090020962021</td><td>दाखल दिनांक</td><td>:</td><td>२६/०६/२०२१</td></tr>
<tr><td>नोंदणी दिनांक</td><td>:</td><td>२६/०६/२०२१</td></tr>
<tr><td>निकाल दिनांक</td><td>:</td><td>१३/०२/२०२५</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td rowspan="2">:</td><td>वर्षे महिने दिवस</td></tr>
<tr><td>०३ ०७ १८</td></tr>
<tr><td colspan="4"><u>संगमनेर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात</u><br><u>( पिठासीन अधिकारी : श्रीमती यु. डी. जाधव )</u><br><br>नियमीत फौ.ख.क्र. ३८४/२०२१, निशानी क्र. ३३</td></tr>
<tr><td></td><td colspan="3">गुन्हा क्र. I ५१/२०२१ भारतीय दंड संहिता कलम ३९४ अन्वये संगमनेर शहर पोलीस स्टेशन, ता. संगमनेर, जि. अहमदनगर</td></tr>
<tr><td>फिर्यादी</td><td colspan="3">महाराष्ट्र शासन मार्फत,<br>संगमनेर शहर पोलिस ठाणे,<br>ता. संगमनेर, जि. अहमदनगर.</td></tr>
<tr><td>अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता</td><td colspan="3">श्रीमती पी. एन. हेकरे</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td colspan="3">१. योगेश राजेंद्र बो-हाडे<br>वय - २७ वर्षे धंदा - मार्केटींग<br>२. बजरंग रामदास बैरागी<br>वय - २७ वर्षे धंदा - मार्केटींग<br>दोघेही रा. साईश्रध्दा चौक, घुलेवाडी रोड संगमनेर ता. संगमनेर जि. अहमदनगर</td></tr>
<tr><td>आरोपींतर्फे विधिज्ञ</td><td colspan="3">श्री. पी.के. शिंदे</td></tr>
</table>

## भाग-ब

| | |
|---|---|
| पहिली खबर दिनांक | २२/०१/२०२१. |
| दोषारोप दिनांक | २६/०६/२०२१. |
| दोषारोपपत्र ठेवल्याचा दिनांक | ११/०८/२०२२. |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०६/१२/२०२४. |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | ...... |
| न्यायनिर्णयांचा दिनांक | १३/०२/२०२५ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

**आरोपींचा तपशील**

| आरोपींची श्रेणी | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीन वर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी. आर. पी. सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१.** | योगेश राजेंद्र बो-हाडे | २२/०१/२०२१ | २४/०१/२०२४ | भा. दं. संहिता कलम ३९४, प्रमाणे | निर्दोष मुक्त केले | निरंक | निरंक |
| **२.** | बजरंग रामदास बैरागी | २२/०१/२०२१ | २४/०१/२०२४ | भा. दं. संहिता कलम ३९४, प्रमाणे | निर्दोष मुक्त केले | निरंक | निरंक |

**भाग-क**

**अभियोग पक्षाच्या साक्षीदाराची यादी /बचाव /न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | रविंद्र तुकाराम उगलमुगले | फिर्यादी | २९ |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार,पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार , पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
| डि. सा. क्र.१ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार,पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार , पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| सी.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

अभियोग पक्षाचे /बचाव/ कोर्ट निशाणी
अ. अभियोग

| अनु.क्र. | निशानी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निशाणी ३० | फिर्याद |
| २ | निशाणी २८ | मुळ फिर्यादी व आरोपींतर्फे तडजोड पुरसीस |
| ३ | निशाणी ३१ | पुरावा बंद पुरसीस |

**ब-बचाव**

| अनु.क्र. | निशानी क्र. | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशानी**

| अनु.क्र. | निशानी क्र. | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुददेमाल**

| अनु. क्र. | मुददेमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | पी.आर.क्र. २१/२०२३ | रोख रक्कम त्यामध्ये |

| | | |
|---|---|---|
| | | ५००/- रूपयांचे तीन भारतीय चलनी नोटा असे एकुण रूपये १५००/- |

:: **न्यायनिर्णय** ::
(घोषीत केल्याचा दिंनाक: १३/०२/२०२५)

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३९४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीगत खालीलप्रमाणे :-**

**२.** फिर्यादीने अशी फिर्याद दिली की, दिनांक २१/०१/२०२१ रोजी रात्री ७:०० वाजताच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे पंचवटी हॉटेलमध्ये कामास आले असता, आरोपी क्र. १ व २ हॉटेलमध्ये आले व त्यांच्याकडे दारू व जेवन मागुन पैसे देणार नाही असे म्हणाले. त्यावर, फिर्यादी आरोपींना म्हणाला की, ''मी वेटरचे काम करीत असून, तुम्हाला पैसे द्यावे लागतील'', सदर बोलण्याचा आरोपींना राग आल्याने त्यांनी फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहान करून शिवीगाळ दमदाटी केली. त्यावेळी, त्यांचे भांडण हॉटेलमध्ये उपस्थित असणा-या कर्मचा-यांनी सोडविले. त्यानंतर, आरोपी हॉटेलबाहेर गेले. परंतु, त्यांनी पुन्हा फिर्यादीला आवाज देवुन बोलावुन घेवुन मारहान करून त्यांच्या पॅंटच्या खिशातील रक्कम रूपये १,५००/- बळजबरीने काढून घेवुन दमदाटी व शिवीगाळ केली. तसेच, घटनेवेळी, आरोपी दारूच्या नशेत होते. म्हणुन फिर्यादीने आरोपींविरूध्द फिर्याद दिली.

**03.** सदर फिर्यादवरून संगमनेर शहर पोलीस स्टेशनला गु.र.नं. I ५१/२०२१ हा गुन्हा दाखल केला. गुन्हाचा सखोल तपास, तपासी अधिकारी व्ही. जी. खाडे, यांनी केला. घटनास्थळाला भेट दिली. घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. आरोपींविरुध्द पुरावा उपलब्ध झाल्याने त्यांचेविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी हजर झाल्यानंतर त्यांच्याविरुध्द **भारतीय दंड विधान कलम ३९४** अन्वये **निशाणी १०** वर दोषारोप ठेवले असता आरोपींनी दोषारोप नाकारून प्रकरण चालवण्याची विनंती केली. म्हणून आरोपींविरुध्द खटला चालविण्यात आला. साक्षीदारांच्या पुराव्यात आरोपींविरुध्द कोणताही सबळ पुरावा मिळून न आल्याने आरोपीचे **फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३** नुसार निवेदन नोंदविण्यात आले नाही. आरोपींनी त्यांच्या बचावाकरिता कोणताही तोंडी पुरावा दिला नसुन साक्षीदार तपासले नाही. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

**०५.** अभियोग पक्षाने दिलेला साक्षीपुरावा लक्षात घेता, खालील मुद्दे निर्णयाकरिता उपस्थित केले असून त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत येणेप्रमाणे दिले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | दिनांक २१/०१/२०२१ रोजी १९:०० वाजेच्या सुमारास हॉटेल पंचवटी समोर आरोपींनी संगनमत करून त्यांचा उद्देश साध्य करण्यासाठी, हॉटेल पंचवटीमध्ये जावुन, जेवन करून दारू पिणार असून बिल देणार नाहीत असे म्हणून, फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहान करून शिवीगाळ व दमदाटी केली व फिर्यादीच्या पॅटच्या खिशातील रोख रक्कम रूपये १५००/- जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने काढुन घेतले, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली काय ? | नाही |
| ०२. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ करिता :-**

**०६.** प्रस्तुत मुद्दयांच्या अनुषंगाने सर्व प्रथम हे नमूद करणे आवश्यक आहे की, अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. १ रविंद्र तुकाराम उगलमुगले - फिर्यादी यांनी साक्षीपुराव्यादरम्यान कथन केले की, ते आरोपींना ओळखत असून, घटना सन-२०२१ मध्ये हॉटेल पंचवटी येथे दुपारच्यावेळी घडली. घटनेवेळी, आरोपी क्र. १ व २ हे जेवन करण्यासाठी हॉटेलमध्ये आले होते. परंतु, त्यांना जेवन आवडले नाही. म्हणून त्यांनी किरकोळ वाद केला. या व्यतिरिक्त काही घडले नाही. घटनेनंतर त्यांनी आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. फिर्यादीने फिर्याद वरील केवळ त्यांची सही (निशाणी ३०) ओळखली. परंतु फिर्यादमधील मजकूर त्यांना आठवत नसल्याचे फिर्यादीने सांगितले. फिर्यादी हे अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने अभियोग पक्षातर्फे फिर्यादीची उलटतपासणी घेण्याची परवानगी मागितली. परंतु, उलटतपासादरम्यान देखील फिर्यादीने अभियोग पक्षास पुरक असे कोणतेही विधान केलेले नाही. उलटपक्षी फिर्यादीने आरोपी व त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे मान्य केले असून, त्यांना पुढील साक्षीदार तपासावयाचे नसल्याचे त्यांनी मान्य करून त्यांची आरोपींविरुध्द काहीही तक्रार राहिली नसल्याचे मान्य केले आहे.

**०७.** फिर्यादी व आरोपी यांची तडजोड पुरसिस (निशाणी २८) पाहता आरोपी व फिर्यादी यांचेमध्ये किरकोळ कारणांवरून बाचाबाची झाल्याने फिर्यादीने आरोपींविरुध्द फिर्याद दिली होती. त्यानंतर त्यांची आपसात तडजोड झालेली आहे, असे दिसुन येते. फिर्यादीने पुरावा बंद पुरसिस (निशाणी ३१) दाखल केली आहे. फिर्यादी आणि आरोपी यांच्यामध्ये तडजोड झालली आहे. त्यामुळे, फिर्यादीने स्वत:ची साक्ष उपरोक्त प्रमाणे नोंदविली आहे असे दिसुन येते. एकंदरीत अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे

दिसुन येते की, अभियोग पक्षास फिर्यादी यांनी सहाय्य केलेले नाही. सबब, सदर साक्षीदाराच्या साक्षीचा अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य झालेले नाही.

**०८.** एकंदर वर चर्चिलेल्या अभियोग पक्षाच्या साक्षीदाराच्या पुराव्यावरुन आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला शिवीगळ, दमदाटी व मारहान करून, जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने त्याच्या पॅटच्या खिशातील रक्कम रूपये १५,००/- बळजबरीने काढून घेतले, असे अभियोग पक्षाने सबळ पुराव्यानिशी शाबीत केलेले नाही. सबब, नमुद मुद्दे सिध्द करण्यासाठी कुठलाही पुरावा उपलब्ध नाही. सबब, मुद्दे क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करिता :-</u>**

**०९.** अभियोग पक्ष हा आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यासाठी पुर्णत: अपयशी ठरला आहे. सबब, आरोपींविरुध्द सबळ व ठोस पुराव्यानिशी कोणताही गुन्हा सिध्द न झाल्याने आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र ठरतात. तसेच, फिर्यादीने त्याच्या पुर्वीच्या जबाबाशी विसंगत साक्ष दिलेली आहे. फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये आपसात तडजोड झाल्याचे निशाणी २८ वरील पुरसीस नुसार दिसुन येते. म्हणून फिर्यादीने त्याच्या पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन केले असावे. त्यामुळे, आरोपींविरुध्द खोटी साक्ष दिली. म्हणून कारवाई करणे योग्य होणार नाही. गुन्हयातील जप्त मुद्देमाल रोख रक्कम रूपये १,५००/- ताब्यात मिळणेकामी आजतागायत कोणीही अर्ज केला नसल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. त्यामुळे, प्रस्तुत गुन्हयातील रोख रक्कम सरकार जमा करण्यात यावी. सबब, मुद्दे क्र १ च्या निष्कर्षान्वये तसेच, मुद्रा क्र. २ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

**<u>आदेश</u>**

१ आरोपी क्र. १ योगेश राजेंद्र बो-हाडे आणि आरोपी क्र. २ बजरंग रामदास बैरागी यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे

कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम ३९४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२ आरोपींचे जामीनपत्र व स्वबंधपत्र रद्द करण्यात येतात.

३ आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ नुसार अपील कोर्टात हजर राहणेकामी त्याचे प्रत्येकी स्वबंधपत्र व जामीन बंधपत्र रूपये १५,०००/- चे दयावे.

४ गुन्हयातील जप्त मुद्देमाल रोख रक्कम १५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये एक हजार पाचशे रूपये फक्त) ही अपिल कालावधी नंतर सरकार जमा करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

USHA DEVIDAS JADHAV

Digitally signed by USHA DEVIDAS JADHAV
DN: cn=USHA DEVIDAS JADHAV, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950338, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.02.13 17:21:42 +0530

ठिकाण : संगमनेर
दिनांक : १३/०२/२०२५

**(यु. डी. जाधव )**
न्यायदंडाधिकारी,प्रथम वर्ग,
(न्या. क्र. ३) ता.संगमनेर,जि.अहमदनगर